महाराष्ट्र टाईम्स 12 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



यूपीएससी परीक्षेत यश संपादन केलेल्या अमोघ थोरातचा सत्कार करताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जगन कराडे, उपकुलसचिव संजय कुबल, उपकुलसचिव जी. एस. राठोड.

# 'अमोघ थोरात यांचे यश प्रेरणादायी'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

**यूपीएससीतील यशाबद्दल कुलगुरूंच्या हस्ते गौरव**

'सर्वसाधारण परिस्थितीतून मोठे यश संपादन करणाऱ्या अमोघ थोरात यांचे यश विद्यापीठामध्ये स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहेत' असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचा विद्यार्थी अमोघ थोरात यांच्या सत्कारप्रसंगी कुलगुरु डॉ. शिंदे बोलत होते.

अमोघने युपीएससी परीक्षेत ९६६ व्या क्रमांकास यश संपादन केले. विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांच्यासह अमोघने कुलगुरू डॉ. शिंदे यांची भेट घेतली. यावेळी त्याचा शाल, स्मृतीचिन्ह व राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ देवून सत्कार करण्यात आला.

अमोघ याने 'माझ्या यशामध्ये विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राच्या मार्गदर्शनाचा महत्त्वाचा वाटा आहे. मी स्वयं अधयानातून यश मिळवले आहे. २०१० पासून आतापर्यंत एक ते सहा गुणांच्या फरकाने युपीएससीमधील गुणांकन हुकले. पण संयम राखून सातत्यपूर्ण प्रयत्नांनी यश साध्य केले. याचा मोठा आनंद आहे. या या यशात मार्गदर्शन केंद्राचा अधिक वाटा आहे ' अशी प्रतिक्रिया अमोघ थोरातने व्यक्त केली.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जगन कराडे, उपकुलसचिव संजय कुबल, उपकुलसचिव जी. एस. राठोड आदी उपस्थित होते.

**आठ एकरांत चार शेततळी साकारणार : तलाव, विहिरींच्या पुनरुज्जीवनाचे काम सुरु**

# शिवाजी विद्यापीठाचे पाण्याबाबत स्वयंपूर्णतेचे पाऊल!

संतोष मिठारी • कोल्हापूर

**दुष्काळाची** स्थिती लक्षात घेता, भविष्यात पाण्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने पाऊल टाकले आहे. यासाठी विद्यापीठाच्या परिसरातील आठ एकर जागेत चार शेततळी साकारण्यासह दोन तलाव आणि आठ विहिरींच्या स्रोतांच्या पुनरुज्जीवनाचे काम राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि विद्यापीठाच्या प्रशासनाने सुरु केले आहे. शेततळ्यांद्वारे वर्षाला सुमारे दीड कोटी लिटर पाणीसाठा करण्याचे नियोजन केले आहे.

आदित्य वेल्हाळ





पाण्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठामध्ये शेततळी साकारण्याचे काम वेगाने सुरु आहे. दुसऱ्या छायाचित्रात कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाने शेततळी साकारण्यासह विहिरी, तलावांच्या स्रोतांच्या पुनरुज्जीवनाचे काम सुरु केले आहे. याअंतर्गत विद्यापीठातील पाण्याची उपलब्धता तपासण्यासाठी सुतार विहिरीजवळ १५ फूट खड्डा खणला. यात परिसरातील नैसर्गिक स्रोतांद्वारे पाच फुटांपर्यंत पाणी जमा झाले.



पाणी हे जीवन आहे; त्यामुळे त्याचा प्रत्येकाने गरजेनुसारच वापर करावा, त्याचा अपव्यय करु नये. सध्याची दुष्काळाची स्थिती लक्षात घेता, पिण्यासाठी ग्लास भरुन पाणी घेण्याऐवजी तांब्या आणि फुलपात्राचा वापर करावा. पाणीबचतीसाठी तरुणाईने अधिकतर पुढाकार घ्यावा. त्यांनी स्वत: ते आचरणात आणून इतरांना पाणीबचतीचे महत्व पटवून द्यावे. त्या दृष्टीने विविध उपक्रम राबवावेत. दुष्काळ आहे म्हणून पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. मात्र, यापुढेही दुष्काळाची परिस्थिती येऊ नये या दृष्टीने प्रत्येकाने पाण्याचे नियोजन करावे. घरे, कार्यालयांच्या ठिकाणी रेनवॉटर हार्वेस्टिंग करण्यात यावे. पाण्याचा एक-एक थेंब वाचवावा. 'लोकमत'तर्फे विविध स्वरुपांतील सामाजिक बांधीलकी जोपासणारे उपक्रम राबविले जातात. याअंतर्गत 'लोकमत'ने सध्या हाती घेतलेला 'जलमित्र अभियान' हा उपक्रम स्तुत्य आहे. त्यातून अत्यंत चांगल्या पद्धतीने समाजातील विविध घटकांपर्यंत जलसाक्षरता पोहोचणार आहे.

- कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी विद्यापीठ

विद्यापीठ हे मुख्य इमारतीवरील रेनवॉटर हार्वेस्टिंग तसेच परिसरातील दोन तलाव आणि सुस्थितीत असलेल्या सहा विहिरींमध्ये पावसाळ्यात पाणी संकलित करते. त्याचा दरवर्षी जून ते फेब्रुवारीपर्यंत वापर करते.

विद्यापीठाला रोज सहा लाख लिटर पाणी लागते. मार्च ते मे महिन्यापर्यंत कोल्हापूर महानगरपालिकेकडून ते रोज चार लाख ६० हजार लिटर पाणी विकत घेते. गेल्या वर्षी कमी पाऊस झाल्याने विद्यापीठातील जलसाठ्यांमधील पाण्याचे प्रमाण घटले. त्यामुळे विद्यापीठाला पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे.

दुष्काळी स्थिती लक्षात घेऊन पाण्याबाबत वर्षभर स्वयंपूर्ण होण्याचा निर्धार प्रशासनाने केला. त्यानुसार विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग ते अभियांत्रिकी शेड परिसरातील आठ एकर जागेमध्ये चार शेततळी साकारण्याचे काम गेल्या चार दिवसांपासून सुरु केले आहे. 'एनएसएस'चे स्वयंसेवक, शारीरिक शिक्षण संचालक, विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांच्या श्रमदान, मदतीतून या शेततळ्यांचे काम सुरु आहे. सध्या एका शेततळ्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यासह वि. स. खांडेकर भाषाभवन आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागाजवळील तलाव तसेच अन्य परिसरांतील आठ विहिरींचे नैसर्गिक स्रोत खुले करण्यासह गाळ काढण्याचे काम केले जात आहे. या स्रोतांच्या माध्यमातून विद्यापीठ पाण्याबाबत स्वयंपूर्ण होणार आहे.

**उपलब्ध पाण्याचे सुनियोजन**

विद्यापीठाच्या ८५३ एकर परिसरात विविध ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे. त्याचे योग्य नियोजन करण्याचा प्रयत्न प्रशासन करीत असल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, आठ एकर परिसरात चार शेततळी साखळी पद्धतीने साकारण्यात येत आहेत.

कमीत कमी एक ते जास्तीत जास्त पाच एकरांमध्ये शेततळे साकारण्यात येणार आहे. याद्वारे थेट जमिनीमध्ये पाणी मुरविले जाईल. शिवाय संकलित झालेले पाणी विहिरी, तलावांत वळविण्यात येईल. महानगरपालिकेकडून घेतल्या जाणाऱ्या पाण्यासाठी विद्यापीठाला दरमहा साडेपाच लाख रुपये खर्च येतो. तो वाचविला जाणार आहे. त्यासह पाणीबचतीसाठी विद्यापीठातील विविध विभागांमध्ये स्वयंचलित बंदकळ (ऑटो स्टॉप) बसविले जाणार आहेत.

परिसरात कुठेही कूपनलिका मारल्या जाणार नाहीत. त्यासह जलसाक्षरतेचा उपक्रमही राबविण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ 12 MAY 2016



कोल्हापूर : अमोघ थोरात याचा सत्कार करताना डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जगन कराडे, संजय कुबल, जी. एस. राठोड.

# 'यूपीएससी'त चमकलेल्या अमोघ थोरातचा सत्कार

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचा विद्यार्थी अमोघ थोरात याने यूपीएससी परीक्षेत ९६६ व्या क्रमांकासह यश संपादन केल्याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज सकाळी त्याचा सत्कार केला. सर्वसाधारण परिस्थितीतून मोठे यश संपादन करणाऱ्या अमोघचे यश विद्यापीठात स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार डॉ. शिंदे यांनी काढले.

विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांच्यासह अमोघ थोरात (सांगली) याने आज सकाळी कुलगुरू डॉ. शिंदे यांची त्यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली. 'आपल्या यशात विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राच्या मार्गदर्शनाचा महत्त्वाचा वाटा असून त्याव्यतिरिक्त आपण अन्यत्र कोठेही मार्गदर्शनासाठी धावपळ न करता सारा अभ्यास घरीच केला. २०१० पासून आतापर्यंत अगदी एक ते सहा गुणांच्या फरकाने माझे यूपीएससीमधील गुणांकन हुकले; पण संयम राखून सातत्यपूर्ण प्रयत्नांनी हे यश साध्य करता आल्याचा आनंद मोठा आहे.' अशी भावना अमोघ याने व्यक्त केली. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठातर्फे शाल, स्मृतिचिन्ह व राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ भेट देऊन अमोघचा सत्कार केला. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जगन कराडे, उपकुलसचिव संजय कुबल, उपकुलसचिव जी. एस. राठोड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत 12 MAY 2016



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे अमोघ थोरात यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जगन कराडे, डॉ. जी. एस. राठोड, अलोक जत्राटकर आदी.

# सर्वसामान्य परिस्थितीतून यश संपादन करणे कौशल्याचे : डॉ. शिंदे

प्रतिनिधी
कोल्हापूर

सर्वसामान्य परिस्थितीतून मोठे यश संपादन करणे कौशल्याचे आहे. अमोघ थोरात यांनी अशाच प्रकारे यश प्राप्त केले. त्यांचे यश विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणारे आहे, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. शिंदे यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी अमोघ थोरात यांनी यूपीएससी परीक्षेत ९६६ व्या क्रमांकासह यश संपादन केल्याबद्दल डॉ. शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. शाल, श्रीफल, स्मृतिचिन्ह व राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ असे सत्काराचे स्वरूप होते.

सत्काराला उत्तर देताना थोरात म्हणाले, "सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय कामकाजाची प्रेरणा मिळण्यासाठी शाहूंचा चरित्रग्रंथ प्रत्येकाने जवळ बाळगावा. माझ्या यशामध्ये विद्यापीठातील सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचा महत्त्वाचा वाटा आहे. केंद्रातील डॉ. जगन कराडे यांच्यासह इतर प्राध्यापकांशिवाय मी अन्यत्र मार्गदर्शनासाठी गेलो नाही. त्यामुळे विद्यापीठानेच मला उच्च स्थानावर नेऊन पोचवले आहे. एक ते सहा गुणांच्या फरकाने माझे यूपीएससीमधील गुणांकन जात होते; पण हे यश साध्य करता आल्याचा मला आनंद आहे."

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सेवापूर्व मार्गदर्शन केंद्रप्रमुख डॉ. जगन कराडे, उपकुलसचिव जी. एस. राठोड आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

12 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : यूपीएससी परीक्षेत ९६६ व्या क्रमांकासह यश संपादन केल्याबद्दल अमोघ थोरात यांचा सत्कार करताना कुलगुरू देवानंद शिंदे. सोबत प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे व इतर.

# थोरात यांचे यश विद्यार्थ्यांना प्रेरणादायी

## - कुलगुरू देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी अमोघ थोरात यांनी यूपीएससी परीक्षेत ९६६ व्या क्रमांकासह यश संपादन केल्याबद्दल कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सर्वसाधारण परिस्थितीतून मोठे यश संपादन करणाऱ्या अमोघ यांचे यश विद्यापीठात स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्‌गार डॉ. शिंदे यांनी काढले.

विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांच्यासह अमोघ थोरात यांनी कुलगुरु डॉ. शिंदे यांची त्यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी अमोघ यांच्याविषयी आपुलकीने चौकशी केली. यावेळी माझ्या यशामध्ये विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राच्या मार्गदर्शनाचा महत्त्वाचा वाटा असून त्याव्यतिरिक्त आपण अन्यत्र कोठेही मार्गदर्शनासाठी धावपळ न करता सारा अभ्यास घरीच केला. सन २०१० पासून आतापर्यंत अगदी एक ते सहा गुणांच्या फरकाने माझे यूपीएससीमधील गुणांकन हुकले; पण संयम राखून सातत्यपूर्ण प्रयत्नांनी हे यश साध्य करता आल्याचा आनंद मोठा आहे, अशी भावना अमोघ यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठातर्फे शाल, स्मृतिचिन्ह व राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ भेट देऊन अमोघ यांचा सत्कार केला. राजर्षी शाहू महाराजांप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय कामकाज करण्याची प्रेरणा मिळत राहावी, यासाठी हा चरित्रग्रंथ सदैव सोबत बाळगावा, असे कुलगुरूंनी यावेळी सांगितले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जगन कराडे, उपकुलसचिव संजय कुबल, उपकुलसचिव जी. एस. राठोड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत 12 MAY 2016

# मूलभूत संकल्पनेतून इतिहासाचे सक्षमीकरण

## देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठात ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर : एखादी वास्तू धार्मिक, ऐतिहासिक, पुरातत्त्व यांपैकी कोणत्या गटात मोडते याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम असतो. या मूलभूत संकल्पनांमधील फरक समजून घेणारा ग्रंथ उपलब्ध झाल्यास इतिहासाचे सक्षमीकरण होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

प्राचार्य य. ना. कदम यांच्या 'आधुनिक भारताचा इतिहास- महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह' ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीचे बुधवारी शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन मंडळ सभागृह येथे प्रकाशन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, फडके प्रकाशनचे मोरेश्वर फडके, आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य कदम यांनी ग्रंथातून मोठा कॅनव्हास मांडला आहे. ज्ञानाचे अनेक मूलभूत संदर्भ यामधून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील. तसेच या ग्रंथातील 'मेक इन इंडिया'वरील प्रकरणातून ही संकल्पना सोप्या पद्धतीने समजण्यास मदत होईल.

ज्येष्ठ इतिहास संशोधक पवार म्हणाले, इतिहासातील अनेक बारीकसारीक संदर्भ या पुस्तकातून उपलब्ध झाले आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा विस्तृत आढावा या पुस्तकातून घेण्यात आला आहे.

दरम्यान, प्रा. डॉ. अवनीश पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या भूमिकेतून या ग्रंथाचे महत्त्व मनोगतातून व्यक्त केले. तसेच माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी इतिहास सोप्या पद्धतीने समजावून घेण्यासाठी हे पुस्तक उपयोगी असल्याचे सांगितले. प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी सूत्रसंचालन, तर प्राचार्य य. ना. कदम यांनी स्वागत केले.

सकाळ
12 MAY 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऐतिहासिक, पुरातत्त्व स्थळांतूनच इतिहास समजेल

## कुलगुरू डॉ. शिंदे : प्राचार्य य. ना. कदमलिखित 'आधुनिक भारताचा इतिहास'चे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ११ : ऐतिहासिक स्थळे, पुरातत्त्व स्थळे आणि धार्मिक स्थळे हे जोपर्यंत समजणार नाहीत, तोपर्यंत इतिहास समजणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

प्राचार्य य. ना. कदमलिखित 'आधुनिक भारताचा इतिहास' पुस्तकाच्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन कुलगुरूंच्या उपस्थितीत झाले. त्या वेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात हा कार्यक्रम झाला. ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. अरुण भोसले, बाबा सावंत, प्रकाशक मोरेश्वर फडके आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, "मेक इन इंडिया आणि मेड इन इंडिया यामधील फरक स्पष्टीकरणासाठी या पुस्तकाकडे पाहिले पाहिजे. पुरातत्त्व विभागात काम करणाऱ्यांना इतिहास आणि विज्ञान समजले पाहिजे. इतिहासाचे आणि विज्ञानाचा दृढ संबंध आहे. जसे इतिहास लिहिणे हे आव्हान आहे, तसेच त्याचे पुनर्लेखन करणे हेही आव्हान आहे. आजचा वाचक तंत्रज्ञानामध्ये प्रगत आहे. इतिहास, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा एका सरळ रेषेत संबंध येतो. ऐतिहासिक स्थळे, पुरातत्त्व स्थळे आणि धार्मिक स्थळे हे जोपर्यंत समजणार नाहीत, तोपर्यंत इतिहास समजणार नाही आणि त्याशिवाय इतिहासाचे सक्षमीकरण होणार नाही. या पुस्तकामध्ये खूप चांगली माहिती संकलित झालेली आहे."

लेखक प्राचार्य कदम म्हणाले, "इतिहास हा विषय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ऐच्छिक होता. परंतु २०१२ पासून इतिहास हा विषय सक्तीचा केलेला आहे. सनदी नोकरांना इतिहासाची माहिती असल्याशिवाय कामच करता येणार नाही. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना या अद्ययावत पुस्तकाचा उपयोग होत आहे." अवनिश पाटील, डॉ. अरुण भोसले, डॉ. पवार यांची भाषणे झाली. प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी सूत्रसंचालन केले. मंदार फडके यांनी आभार मानले.


तरुण भारत 12 MAY 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आता बुधाचे पुढील अधिक्रमण २०१९ मध्ये

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे सोमवारी पन्हाळा येथून बुधाच्या अधिक्रमणाची डॉ. ए. के. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षणे घेण्यात आली. बुधाचे पुढील अधिक्रमण सन २०१९ मध्ये होणार असल्याची माहिती डॉ. ए. के. शर्मा यांनी दिली.

निरभ्र आकाशामुळे पन्हाळा येथून बुधाचे सूर्यासमोरून अधिक्रमण अतिशय उत्तम प्रकारे पाहता आले. सोमवारी दुपारी ४.४० ते सायंकाळी ६.४५ वाजेपर्यंत या अधिक्रमणाची विविध टप्प्यांमधील निरीक्षणे घेण्यात आली. पाच इंची सीएस प्लस टेलिस्कोपच्या सहाय्याने ही निरीक्षणे घेण्यात आली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रातून बुधाच्या अधिक्रमणाची घेतलेली छायाचित्रे. सुर्याच्यासमोर वर्तुळामध्ये दिसणारा बुध आहे, तर अन्यत्र दिसणारा काळा ठिपका म्हणजे सौरडाग आहे.

बुधाचे संक्रमण शंभर वर्षातून साधारण १३ वेळा पाहायला मिळते. किमान चार वर्षातून एकदा किंवा १० ते १२ वर्षातून एकदा असा त्याचा कालावधी असतो. बुध हा सूर्यापासून सर्वात जवळचा ग्रह आहे.


काही ठराविक वर्षांनी हा ग्रह सूर्याच्या व पृथ्वीच्यामध्ये येतो. याला बुधाचे अधिक्रमण म्हणतात. तो सूर्यासमोरून सरकत जात असताना, सूर्याच्या पृष्ठभागावरून काळसर ठिपका सरकल्याप्रमाणे दिसतो. यापुर्वीचे अधिक्रमण ८ नोव्हेंबर २०१६ रोजी झाले होते. पुढील संक्रमण ११ नोव्हेंबर २०१९ रोजी होईल, अशी माहिती डॉ. ए. के. शर्मा यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी 12 MAY 2016

# बुध ग्रहाचे पुढील अधिक्रमण २०१९ मध्ये

## डॉ. ए. के. शर्मा यांची माहिती



**विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रातून घेतलेली छायाचित्रे. सूर्याच्या समोर वर्तुळामध्ये दिसणारा बुध, तर अन्यत्र दिसणारा काळा ठिपका सौरडाग आहे.**

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे पन्हाळा येथून बुधाच्या अधिक्रमणाची डॉ. ए. के. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षणे घेण्यात आली. बुध ग्रहाचे पुढील अधिक्रमण सन २०१९ मध्ये होणार असल्याची माहिती डॉ. शर्मा यांनी दिली.

निरभ्र आकाशामुळे पन्हाळा येथून बुधाचे सूर्यासमोरून अधिक्रमण अतिशय उत्तम प्रकारे पाहता आले. सोमवारी सायंकाळी ४.४० वाजल्यापासून ते ६.४५ वाजेपर्यंत या अधिक्रमणाची विविध टप्प्यांवरील निरीक्षणे घेण्यात आली. पाच इंची सी एस + टेलिस्कोपच्या साहाय्याने ही निरीक्षणे घेण्यात आली.

बुधाचे संक्रमण शंभर वर्षांतून साधारण १३ वेळा पाहायला मिळते. किमान चार वर्षांतून एकदा किंवा १० ते १२ वर्षांतून एकदा असा त्याचा कालावधी असतो. बुध हा सूर्यापासून सर्वात जवळचा ग्रह आहे. काही ठरावीक वर्षांनी हा ग्रह सूर्याच्या व पृथ्वीच्या मध्ये येतो, याला बुधाचे अधिक्रमण म्हणतात. तो सूर्यासमोरून सरकत जात असताना सूर्याच्या पृष्ठभागावरून काळसर ठिपका सरकल्याप्रमाणे दिसतो. यापूर्वीचे अधिक्रमण ८ नोव्हेंबर २००६ रोजी झाले होते. पुढील संक्रमण ११ नोव्हेंबर २०१९ रोजी होईल, अशी माहिती डॉ. शर्मा यांनी यावेळी दिली. या वेळी अवकाश संशोधकांसह हौशी निरीक्षक व पर्यटकांनीही हे अधिक्रमण पाहण्याचा आनंद घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत 12 MAY 2016

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेशपूर्व परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी तिसऱ्या टप्प्यातील सर्व प्रवेशपूर्व परीक्षा ऑफलाईन पद्धतीने सुरळीत पार पडल्या. एमसीए सायन्स, कॉमर्स, एमएस्सी गणित, बॉटनी, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, स्टॅटिकटिक्स, मायक्रो बायोलॉजी, फिजिक्स, जिओलॉजी या अभ्यासक्रमांचा सहभाग होता. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतून ६१२१ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला होता. त्यापैकी ५१७४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ९४७ विद्यार्थी गैरहजर होते.



शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झालेल्या एमसीए सायन्स परीक्षेसाठी २३३ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. यापैकी २१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १७ विद्यार्थी गैरहजर होते. एमसीए कॉमर्स विषयासाठी ९३ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले, त्यापैकी ७४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १९ विद्यार्थी गैरहजर होते. एमएस्सी गणित विषयासाठी १०९३ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले, तर १००३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ९३ विद्यार्थी गैरहजर होते.

तरुण भारत 12 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीरांना अभिवादन ....!



कोल्हापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पुतळयास अभिवादन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एस. एस. महाजन आदी.

पुढारी 12 MAY 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहभागातून शेततळे जलसंधारण योजना कामाच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. उपस्थित शारीरिक शिक्षण संचालक.

# जलसंधारण कामामध्ये शारीरिक शिक्षण संचालकांचा सहभाग

## विद्यापीठात 'पाणी आडवा, पाणी जिरवा' अभियान प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या जलसंधारण निर्मिती उपक्रमाला विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शारीरिक शिक्षकांच्या सहभागाचे आयाम लाभले. अभियानामध्ये सर्व शिक्षक दोन दिवस सक्रिय सहभाग देणार आहेत. मंगळवारी (दि.१०) सकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्‌घाटन झाले.

विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून शेततळे जलसंधारण योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. १३ मे पर्यंत हे श्रमदान शिबिर सुरू राहणार आहे. विद्यार्थ्यांचे श्रमदान सुरू असतानाच वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघाच्या वतीने 'पाणी अडवा पाणी जिरवा' अभियानात सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाच्या बाभूळवन परिसरात श्रमदानातून शेततळे साकारण्याच्या कार्यात योगदान देण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित तिन्ही जिल्ह्यांतील महाविद्यालयीन शारीरिक शिक्षक एकत्र आले आहेत. जेसीबीच्या सहाय्याने गाळ काढण्याबरोबरच प्रस्तावित शेततळ्याच्या चारी बाजूंनी बंधारा तयार करण्याचे काम दोन दिवसांत करण्यात येणार आहे. यासाठी होणारा खर्च तिन्ही जिल्ह्यांतील शारीरिक शिक्षण संचालकांमार्फत करण्यात येणार आहे.

यावेळी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख पी. टी. गायकवाड यांच्यासह शारीरिक शिक्षक उपस्थित होते. महादेव सूर्यवंशी (जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर), दीपक डांगे (पाटण कॉलेज, पाटण), संजय पाटील, (रेठरे बुद्रुक), राजू बनसोडे (नाईट कॉलेज, सांगली), गणेश सिंहासने (महिला महाविद्यालय, तासगाव), शिवराज गायकवाड (रहिमतपूर महाविद्यालय, रहिमतपूर), संदीप पाटील, बाजीराव पाटील मोलाचे सहकार्य लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत 22 MAY 2016 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात जलसंधारणाचे काम सुरू

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत विद्यापीठात सुरू केलेल्या 'पाणी अडवा पाणी जिरवा' काम उत्साहात सुरू आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे. मुलांचा उत्साह पाहून शारीरिक शिक्षण विभागातील शिक्षकही शेततळयाचे काम करण्यासाठी पुढे आले आहेत.

शिवाजी विद्यापीठाने विहिरींबरोबर शेततळी करण्याचा निर्णय घेतल्यामुळे भविष्यात विद्यापीठाला पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार नाही. शेततळयाचे ३० टक्के काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती विद्यार्थ्यांनी दिली आहे. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शेततळयाचे येत्या कांही दिवसात काम पूर्ण होणार आहे.

यावेळी बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, क्रिडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड, महादेव सुर्यवंशी, दीपक डांगे, संजय पाटील, राजू बनसोडे, गणेश सिंहासने, शिवराज गायकवाड, बाजीराव पाटील आदी उपस्थित होते.

सकाळ 12 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलसंधारणनिर्मितीला मिळतेय बळ

## उपक्रमाचे उद्घाटन : सेवा योजनेतून शारीरिक शिक्षक करणार श्रमदान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सुरू केलेल्या जलसंधारणनिर्मिती उपक्रमाला आज विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शारीरिक शिक्षकांच्या सहभागाचे आयाम मिळाले. अभियानामध्ये सर्व शिक्षक दोन दिवस सक्रिय सहभाग देणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या उपक्रमाचे औपचारिक आज उद्घाटन करण्यात आले.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून शेततळे जलसंधारण योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे श्रमदान सुरू असतानाच वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघातर्फे 'पाणी अडवा पाणी जिरवा' अभियानात सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाच्या बाभूळवन परिसरात श्रमदानातून शेततळे साकारण्याच्या कार्यात योगदान देण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित तिन्ही जिल्ह्यांतील महाविद्यालयीन शारीरिक शिक्षक एकत्र आले आहेत. जेसीबीच्या साहाय्याने गाळ काढण्याबरोबरच प्रस्तावित शेततळ्याच्या चोहोबाजूंनी बंधारा तयार करण्याचे काम या दोन दिवसांत करण्यात येणार आहे. यासाठी होणारा खर्च तिन्ही जिल्ह्यांतील शारीरिक शिक्षण संचालकांमार्फत करण्यात येणार आहे.

या वेळी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख पी. टी. गायकवाड उपस्थित होते. महादेव सूर्यवंशी (जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर), दीपक डांगे (पाटण कॉलेज, पाटण), संजय पाटील, (रेठरे बुद्रुक), राजू बनसोडे (नाइट कॉलेज, सांगली), गणेश सिंहासने (महिला महाविद्यालय, तासगाव), शिवराज गायकवाड (रहिमतपूर महाविद्यालय, रहिमतपूर), संदीप पाटील, बाजीराव पाटील यांचे सहकार्य मिळत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India 12 MAY 2016

# Varsity creating farm ponds on campus

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** With the monsoon expected to begin soon, Shivaji University, Kolhapur (SUK), has started implementing measures to save water on its campus.

The varsity has enlisted the help of the National Service Scheme (NSS) unit, as well its students and faculty members who are digging farm ponds for storing water.

Vice-chancellor Devanand Shinde inaugurated the 'shramdan' initiative at the university on Tuesday morning in the presence of enthusiastic NSS students and faculty members.

According to the university officials, the 'shramdan' initiative will end on May 13, and the ponds will help storing water once the hopefully ample rains begin soon.

A university official said that the varsity is already taking steps necessary to tackle the drought-like situation in future.

"We do not want to repeat what the university witnessed this year. The dates of the examinations had to be advanced due to the water shortage, while the botanical department is struggling to ensure the survival of the plants in its garden. Many of the departments are already struggling to get ample water for laboratory experiments or even for drinking," said the official.

The official added that physical education teachers from Sangli, Satara and Kolhapur districts participated in Tuesday's initiative and the university is getting a good response to the voluntary work.

An official from the botany department had said last week that the two artificial ponds they created three years ago have barely any water left. The ponds serve as the primary source of water for the botanical garden and another 500 endemic plants. One of the ponds is located near the borewell behind Bhasha bhavan.